*Run by DARJ Training & Research Institute, Amravati Rg. No. MAH/189/12
**Recommended by Sant Gadge Baba Amravati University, Amravati, Dir. No. 37/2012
***Financial Assistant of Indian Council of Social Science Research, Mumbai (ICSSR)/DARJ-83/676/12

Peer Reviewed and Referred Journal / ISSN 0975-590X


Inter Disciplinary Journal

DARJ

# DECISION AND ACTION RESEARCH JOURNAL

SPECIAL ISSUE

(1) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



## वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज 'साहित्य व कार्य'

तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो ।
सकलांचे लक्ष तुजकडे वळो ।
मानवतेचे तेज झळझळो ।
विश्वामाजी या योगे ।

"भारतीय वीर जवानांना समर्पीत"

४थे राज्यस्तरीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज

विचार साहित्य संमेलन १७

वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवा समिती, अकोला

रजि नं. ३१०/१४ एफ २७७९८

संपादक – डॉ. राजीव बोरकर

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे काव्यातील सामाजिक विचार

डॉ. वैशाली देशमुख
संगीत विभाग प्रमुख,
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद.

भारतातील महाराष्ट्र राज्यातील एक सुप्रसिध्द संत म्हणुन ओळखल्या जाणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज. तुकडोजी महाराज अमरावती जिल्हा येथील यावली या गावात एका अत्यंत गरीब परिवारात जन्मास आले. तुकडोजी यांचे प्रारंभिक शिक्षण यावली व वरखेड येथे झाले. प्रारंभिक जीवनातच तुकडोजी यांना महान संतांचा सहवास लाभला त्यामुळे आध्यात्मिक विकास बालवयातच झाला. समर्थ अकडोजी महाराजांचे तुकडोजींवर विशेष प्रेम यामुळे अकडोजी महाराज यांनी योगाभ्यास या सारख्या साधनांनी तुकडोजींना परिपूर्ण केले. संतजनांच्या सानिध्यामुळे अध्यात्माची प्रेरणा ही त्यांना बालवयापासुनच मिळाल्याने त्यांच्या भजन काव्यांमध्ये हे अत्यंत लिलया आपल्याला प्रत्ययास येते.

तुकडोजी यांच्या भजन काव्यातील विशेष म्हणजे अंधश्रद्धा तसेच सामाजिक संरचनेचे परिवर्तनशिल तत्वे हे अधिक प्रमाणात प्रतित होतात. महाराजांनी भजन काव्य मंराठी आणि हिंदी या भाषांमध्ये विपुल प्रमाणात केलेले आहेत. या मध्ये प्रामुख्याने सामाजिक आशयांकीत भजन काव्याचा अधिकाधिक उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. तुकडोजींच्या मते, भारत हा खेड्यांचा देश आहे आणि ग्रामविकास झाला तर संपुर्ण राष्ट्राचा विकास होईल या विवेकी भावनेने प्रेरित त्यांनी अनेक काव्य रचनांमधुन आपल्या वैविध्यपुर्ण खंजरी भजनावलीच्या माध्यमातुन प्रचार-प्रसारार्थ विश्व भ्रमंती केली व सामाजिक समस्यांचे मार्मिकपणे उपाय ही तुकडोजींच्या काव्यांमधील विशेषत्वच आहे.

समाजीतल्या सर्वच घटकांचे कल्याण हाच सद्हेतू तसेच उद्येश त्यांच्या काव्यांजलीचा आहे. सामाजिकदृष्ट्या सकलांचे विकासात्मक रूप साध्य करण्यासाठी तुकडोजी यांनी भजन काव्यांच्या माध्यमातुन नवसमाज निर्मितीत खुप मोलाचे असे कार्यवाह झालेत. ते आपल्या एका काव्यांमधुन लोकांकडुन अपेक्षात्मक संदेश देताना सर्वांना उद्येशुन सांगतात.

कशाला काशी जातो रे बाबा
कशाला पंढरी जातो ?
संत सांगतो ते ऐकत नाही इंद्रियांचे ऐकतो
किर्तनी मान डोलतो परी कोंबडी-बकरी खातो

सामान्यजन सदोदीत तिर्थक्षेत्रांना भेटी देतात तरीही स्वतःमध्ये जे आचरणशिलता असायला हवी नेमके तेच करत नाही तसेच या भजनाद्वारे तुकडोजींना हे सांगायचे की संतांच्या शिकवणुकीप्रमाणे आपले दैनंदीन जीवन असावे, आपल्या इंद्रियांवर नियंत्रण कसे मिळवता येईल याकडे लक्ष केंद्रित करावे.

देवाच देवत्व नाही दगडात
देवाच देवत्व नाही लाकडात
सोन्याचांदीत नाही देवाची मात
देव बाजारचा भाजीपाला नाही रे
देव अशान भेटायचा नाही रे

यद्वारे तुकडोजींना हे सांगायचे आहे की मानवी मन हे अनंत भौतिक गोष्टींमध्ये रममान होणारे असते त्यामुळे मनाची अवस्था सतत बदलणारी असते. अशा मनस्थितीत आपण देवत्व दगडात, लाकडात तसेच सोन्याचांदींमध्ये शोधाशोध करायला लागतो. असे न करता काय करावे हे पुढील भजन काव्यात सांगताना म्हणतात.

भाव तिथ देव ही संताची वाणी
टाचारावाचून पाहीला का कोणी
शब्दांच्या बोलात शांती नाही मनी
देव बाजारचा भाजीपाला नाही रे

शुध्द भाव जिथे तिथे देवाचे वास्तव्य आहे असे संतवाणींमध्ये सांगितल्या गेलेले आहे. वाचा मृदु मुलायम असावी, आचारा-विचार सदोदीत शुध्द असावे असे तुकडोजींना या काव्यामधुन सांगायचे आहे.

तुकडोजी पुढील काव्यात काय म्हणतात

देवाच देवत्व ठाई ठाई
मी-तू मेल्याविण अनुभव नाही
तुकड्यादास म्हणे ऐका ही द्वाही
देव बाजारचा भाजीपाला नाही

जेव्हा मनाला देवत्वाची अनुभुती येते त्यावेळी आपला विश्वास दृढ होतो कदाचित हेच तुकडोजींना सांगायचे आहे. देव सर्वठाई आहे याचा अनुभव सुध्दा आपण आपल्यापासुनच शोधले पाहीजे हा सुजानतेचा सदविवेकी समाजविकासात्मक सल्ला या आपल्या भजनामधुन तुकडोजी महाराज स्पश्ट करतात.

या भारतात बंधुभाव नित्य वसु दे, दे वरची असादे
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे मतभेद नसू दे

तुकडोजी महाराजांनी या प्रार्थना काव्याद्वारे सामाजिकते विषयीचे विकासात्मक रूप आपणा समोर स्पष्टपणे प्रस्तुत केलेले आहे. भारतीय समाज अनेक पथांमध्ये प्रस्थापित असुन सुध्दा एकसंघ आहे आणि हे अबाधीत राहण्यासाठी तुकडोजींनी आपल्या गुणवैशिष्ट्यांनी हे अतुलनीय कार्य केले



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science

असल्यामुळे आजपर्यंत सुध्दा अबाधीतच आहे. मानवता हाच मुख्य हेतू आपल्या या भजन काव्याद्वारे त्यांना साधायचा आहे.

सकळास कळो मानवता, राष्ट्रभावना
हो सर्व स्थळी मिळुनी समुदाय प्रार्थना
उद्योगी तरूण शीलवान येथे असू दे

राष्ट्रभावना स्पष्ट करताना तुकडोजींना काय अपेक्षीत आहे तर, तरूण पिढी ही उद्योगी रहावी तसेच प्रत्येकजण हा शीलवान जर असेल तर सामुदायिकता सहज शक्य होवु शकते. यामुळे एकमेकांविषयीची मानवी जाणिव वृध्दिंगत होवुन राष्ट्राचा एकसंघ विकास साधता येणे अवघड नाही.

जातिवाद यावर भाष्य करताना तुकडोजी लिहीतात की,

जातीवाद विसरूनिया एक हो आम्ही
अस्पृश्यता समुळ नष्ट हो जगातुनी
खल निंदका मनीही सत्य न्याय वसू दे

जातीवादाचा विसर व्हावा यासाठी तुकडोजींनी खुप कष्ट घेत भजन काव्यांमधुन खंजरी भजन प्रस्तुतीद्वारे गावोगावी प्रचार-प्रसार केला. संपुर्ण विश्वातील अस्पृश्यता निर्मुलन व्हावे व समताधिष्ठीत समाजव्यवस्था प्रस्थापित व्हावी ही अपेक्षा यातुन स्पष्ट होते.

सामाजिक समस्या तसेच त्यावर उपाय हे आपल्या भजन काव्याद्वारे तुकडोजी महाराजांनी सतत प्रस्थापित करण्यासाठी आयुष्यभर प्रयत्नरत राहिले. आपल्या संपूर्ण आयुष्यातील अत्यंत आग्रही भुमिकेने सामाजिक परिवर्तनात्मक बदलांचे मार्मिक आणि जनसामान्यांच्या भाषेत काव्य निर्मिती केली. 'ग्रामगीता' याद्वारे तुकडोजी महाराजांनी आपला मानवीय दृष्टिकोण सुध्दा संपूर्ण जगासमोर स्पष्ट केला आहे. तुकडोजी महाराजांच्या समाजशील काव्य साहित्यांवर खुप मोठ्या प्रमाणात संशोधन झालेले आहेत आणि आजही सुरू आहेत. सदैव मानवतेचे भजन गाणारे तुकडोजी महाराज आपल्या सर्वांमध्ये समाजशील स्वरसप्तका द्वारे कायम गुणगुणत रहावे.

संदर्भ :

1. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीतासार, डॉ. मनोहर रोकडे, डायमंड पब्लीकेशन 2010.
2. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरवग्रंथ, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.
3. www.nagpuruniversity.org
4. www.hindujagruti.org
5. www.rashtrasanttukdojimaharaj.com
6. www.gramgeeta.org
7. www.bookganga.com

Govt. College of Arts & Science, Aurangabad.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Au...